# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं.१२/२०२५**

| | |
|---|---|
| श्री.जाधव कृष्णत उत्तम<br>मु.पो.सैदापूर, ता.कराड, जि.सातारा | तक्रार अर्जदार |

विरूध्द्

| | |
|---|---|
| १. जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा.<br>२. डॉ.अशोक गुजर टेक्नि.इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा. | वि.प. |

जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा यांचे डॉ.अशोक गुजर टेक्निकल इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा यांचेकडील सहा. प्राध्यापक श्री.जाधव कृष्णत उत्तम यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०३/०६/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी वरील नमूद महाविद्यालयात दि.०२/०१/२०१४ पासून आजपर्यंत सलगपणे बेसीक सायन्स ॲन्ड हयुमॅनिटीज डिपार्टमेंटमध्ये सहा. प्राध्यापक या पदावर कार्यरत आहे. व माझी निवड विद्यापीठ निवड समितीमार्फत झाली आहे. महाविद्यालय नियमाप्रमाणे व्हेकेशन देत नसलेबाबत मी आपणाकडे ३२/२०२३ नुसार तक्रार दाखल केली होती. सदर त.नि.स ने ३२/२०२३ आदेशानुसार (दि.१२ ऑगस्ट २०२४) नियमाप्रमाणे व्हेकेशन देण्याचे आदेश देवूनसुध्दा त्या आदेशाची अंमलबजावणी करणेत आलेली नाही. तरी सदर व्यवस्थापनास ३२/२०२३ (त.नि.स. निकाल) च्या अनुसरून २०२४-२५ च्या हिवाळी व्हेकेशन दिलेल्या नाहीत. तरी सदर व्हेकेशन नियमाप्रमाणे माझ्या खात्यात जमा करण्याचे व तशी सर्व्हिस बुकची प्रत मला देण्याचे आदेश व्हावेत, ही विनंती.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

सदर तक्रार ही १२ ऑगस्ट २०२४ रोजीच्या निकालाची अंमलबजावणी न केलेबददल आहे. महाविद्यालयाने दि.१२ ऑगस्ट २०२४ च्या दिलेल्या निर्णयाचे पालन केले आहे व ७२ अर्जीत रजा त्याच्या खात्यावर वर्ग केले आहे. तसे त्यांना व विद्यापीठ प्रशासनाने कळविलेले आहे.

**समितीची निरिक्षणे :**

सदरहू प्रकरणी आज रोजी सुनावणी घेतल्यानंतर संस्थेतर्फे आणि महाविद्यालयातर्फे उपस्थित असणारे प्राचार्य डॉ.अन्वर मुल्ला यांनी या समितीसमोर हे लेखी स्वरुपात मान्य केले आहे की, संस्थेमार्फत दिलेल्या दि.१९/०९/२०२५ च्या कोष्टकात ज्या १८० रजा दाखविण्यात आलेल्या आहेत त्याचा हिशोब प्राचार्य आणि विभागप्रमुखांना लागू असणारे बंधनानुसार दिल्या असून हे बंधन तक्रारदाराच्या पदाला लागू नसल्यामुळे तक्रारदाराच्या एकूण २२७ दिवसाच्या व्हॅकेशन तक्रारदारांच्या सर्व्हिसबुक मध्ये घेऊन त्यास अर्जित रजा म्हणून मान्यता देण्यात येत आहे. सदरचे निवेदन तक्रारदारास दाखविल्यानंतर तक्रारदार यांनी या दि.१९/०९/२०२५ रोजीच्या पत्रावर सदरची बाब मान्य असल्याचे लिहून दिले आहे. सबब, या तक्रारातील मूळ मागणी आणि विषय संपुष्टात आल्यामुळे प्रस्तुतची तक्रार खारिज करणे क्रमप्राप्त आहे, या निष्कर्षास ही समिती आलेली असून खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

तक्रार खारिज करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

**दिनांक :** 13 OCT 2025

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

**सदस्य सचिव**
**(श्रीमती ए.ए.कदम)**

**सदस्य**
**(श्रीमती ए.एच.कोलेकर)**

**सदस्य**
**(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)**

**सदस्य**
**(डॉ.व्ही.एन.शिंदे)**

**सदस्य**
**(श्री.एस.यु.शिंदे)**

**सदस्य**
**(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )**

**अध्यक्ष**
**(श्री.ए.व्ही.देशपांडे)**